**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव**
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in




**-:प्रेस नोट :-**

दिनांक :- १५/०५/२०२६

# " भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन हद्दीत २१ किलो ९७२ ग्रॅम वजनाचा एकुण ४,३९,४४०/- रुपये किंमतीचा गांजा जप्त: दोन आरोपीतांना अटक "

===ooo===

मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, यांनी " **नशामुक्त भारत (Nasha Mukta Bharat)** " या अभियानांतर्गत संपुर्ण जळगांव जिल्हात अवैध अंमली पदार्थांच्या विक्री/वाहतुक/सेवन बाबत समूळ उच्चाटन करण्यासाठी अंमली पदार्थ बाबत जास्तीत गोपनीय माहिती प्राप्त करून मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्याबाबत जिल्हयातील सर्व प्रभारी अधिकारी/स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी/अंमलदार यांना मार्गदर्शनपर सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुषंगाने श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व अंमलदार यांना गोपनीय माहिती मिळवून जास्तीत जास्त अवैध अंमली पदार्थांच्या विक्री/वाहतुक/सेवन बाबत कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशित केले होते.

दिनांक १४ मे २०२६ रोजी परि.पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत रामदास दरेकर, जळगांव यांना गोपनिय बातमीदार मार्फत माहिती प्राप्त झाली की, भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन हद्दीत शेख अजिज अब्दुल मजिद ऊर्फ अच्चु हा इसम आपले राहत्या घरात गांजा हा अंमली पदार्थ विक्री करीता त्याच्या राहत्या घरात बाळगुन आहे. मिळालेल्या माहितीची पडताळणी करण्यात येवुन .पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत रामदास दरेकर, जळगांव यांनी भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे शाखेचे संयुक्त पथक तयार करण्यात आले.

पथकाने आरोपीत नामे शेख अजिज अब्दुल मजिद ऊर्फ अच्चु (वय ४१) याच्या घराची पंचांसमक्ष झडती घेतली असता, त्याचे राहत्या घराचे हॉलच्या कोपऱ्यात पांढऱ्या रंगाच्या दोन गोण्यांमध्ये **२१ किलो ९७२ ग्रॅम वजनाचा एकुण ४,३९,४४०/- रुपये किंमतीचा गांजा मिळून आला.** सदर कारवाई वेळी पंचा समक्ष फॉरेन्सिक युनिटच्या प्राथमिक तपासणीत सदर पदार्थ 'कॅनॅबिस' (गांजा) असल्याचे निष्पन्न झाले. सदर मुद्देमाल संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करत जप्त करण्यात आला असुन, **आरोपीत क्र. 1) शेख अजिज अब्दुल मजिद ऊर्फ अच्चु 2) सलीम मजिद शेख यांचे विरुध्द भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन गु. रजि. क्र. 239/2026 अन्वये एन.डी.पी.एस. कायदा, 1985 चे कलम 8(ब), 20(ब), 21 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला** असुन, गुन्हाचा पुढील तपास पो-उपनिरी/ मंगेश जाधव, भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक, श्री श्रीकांत धिवरे, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगाव तसेच श्री. केदार बारबोले यांचे मार्गदर्शनाखाली परि.पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत रामदास दरेकर, श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक राहुल तुकराम वाघ, भुसावळ बाजारपेठ, पोउपनिरी/ शेखर डोमाळे पोलीस उपनिरीक्षक मंगेश अनंतराव जाधव, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक रवी पंढरीनाथ नरवाडे, पोहवा/सुनिल दामोदरे, पोहवा/प्रविण हिरवाळे,पोउपनिरी/रवि नरवाडे, पोहवा/गोपाळ गव्हाणे, पोहवा/विजय बळीराम नेरकर, पोहवा/उमाकांत पाटील, मपोहवा/सिमा चौधरी, मपोहवा/मिनाक्षी घेटे पोना/विकास सातदिवे, पोकॉ/भुषण चौधरी, पोकॉ/चंद्रकांत रायपुरकर, पोकॉ/योगेश तसेच चालक सफौ/ सुनील सोनवणे या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**************************************************************************************